| MHGO080005342017 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०५ | ०६ | २०१७ |
| | नोंदणी तारीख | : | ०५ | ०६ | २०१७ |
| | निकाल तारीख | : | १६ | ०३ | २०२६ |
| | कालावधी | : | ०८ व. | ०९ म. | ११ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तिरोडा यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्रीमती अ.तु.बन्सोड यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ५०/२०१७ निशाणी क्र. (३३)**

| | |
|---|---|
| | **गुन्हा क्र : ९१/२०१७**<br>**पोलिस स्टेशन : तिरोडा** |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलिस स्टेशन, तिरोडा पोलीस ठाणे |
| अधिवक्ता | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एज.जी. नागदेवे |
| आरोपी | **सलमान गफार शेख**<br>वय-३१ वर्षे, व्यवसाय-चालक<br>रा. पाचगांव, ता. उमरेड जि. नागपुर |
| अधिवक्ता | **आरोपीं तर्फे वकील श्री. अकबर अली सय्यद** |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | दि.१५/०२/२०१७ |
| प्रथम खबरी तारीख | १५/०२/२०१७ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | ०३/०६/२०१७ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | २५/०३/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | ११/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णयाची तारीख | १६/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

| क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंव्हा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **सलमान गफार शेख** | २८.०२.२०१७ | २८.०२.२०१७ | कलम ३७९ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |

## <u>न्या य नि र्ण य</u>
## ( घोषणा दिनांक १६ मार्च, २०२६)

आरोपी हे भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेले आहेत.

**<u>अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.</u>**

**०२.** आरोपींनी सगणमत करून टिप्पर गाडी क्र. एम.एच.४० ए.के. २११५ रॅयटीची मुदत संपली असतांना देखील ७.५ ब्रास गिट्टी अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आले. त्यामुळे आरोविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला. परंतु आरोपी क्र. २ विरूध्द पुरावा उपलब्ध झाल्यानसल्याने त्यास फौ.प्र.संहिताचे कलम १६९ अन्वये वगळण्यात आले.

**०३.** सदरच्या फिर्यादवरुन आरोपींविरूध्द गुन्हा क्रमांक-९१/२०१७ भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास ना.पो.शि. एकनाथ सोनेवाणे यांच्याकडे देण्यात आला. तपासा दरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवून आरोपींविरुध्द सदर न्यायालयात दोषारोपपत्र

दाखल केले.

**०४.** माझे विधवान पुर्वाधीकारी यांनी आरोपींविरूध्द नि.क्र.०९ अन्वये दोषारोपपत्र नोंदविले. आरोपीला त्यातील मजकूर वाचून व समजावून दाखविण्यात आल्याचे समजते. त्यांनी नि.क्र.१० अन्वये दोषारोप अमान्य करुन खटला चालविण्याची मागणी केली. आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ नुसार नि.क्र. २९ अन्वये निवेदन नोंदवण्यात आले.

**०५.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत प्रकरणाच्या न्यायनिर्णया करिता खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दि.१५/०२/२०१७ रोजी १८.३० ते १९.३० वाजताच्या दरम्यान मौजे चंद्रभागा नाका, तिरोडा, जिल्हा-गोंदिया येथे टिप्पर क्र. एम. एच. ४० ए.के. २११५ मधुन ७.५ ब्रास गिट्टी भरून फिर्यादीच्या समतीशिवाय चोरी करून विना परवाना वाहतुक करतांना मिळुन आले ? | ....नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार |

**: : कारणमिमांसा : :**

**फिर्यादी/आरोपी/ न्यायालयाती साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष :-**

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
| १. | कैलाश दलपत सुरपामे | १२ | पंच |
| २. | एकनाथ रामभाऊ सोनेवाने | १८ | तपासी अधिकारी |
| ३. | मोतीलाल रतिराम मरसकोल्हे | २६ | प्रथम तपासी अधिकारी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | नि. क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| | निरंक | | निरंक |

**क. न्यायालया कडून साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | नि. क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| | निरंक | | निरंक |

**फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी**

**अ. फिर्यादीपक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १९ व २० | आरोपीचे अटक पंचनामे |
| २ | २७ | पंचनामा |

**ब.बचाव पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**<u>मुद्दा क्रमांक ०१ करिता</u>:-**

**०६.** अभियोग पक्षानेसा.क्र. १ कैलास सुरपामे यांना पंच म्हणुन तपासले असता त्यांनी अभियोग पक्षाचे समर्थन केलेले नाही. त्यांनी त्यांच्या समक्ष काहीही जप्त झाले नसल्याचे कथन केले. वारंवार फिर्यादी व इतर साक्षीदारांना समन्स काढले असता ते मिळुन आले नसल्याने अभियोग पक्षाने सदर प्रकरणातील तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली.

७. सा.क्र. ३ मोतीलाल मरस्कोल्हे यांनी आपल्या तोंडी पुराव्यात कथन केले की, दि. १५-०२-२०१७ रोजी पो.स्टे. तिरोडा येथे कार्यरत असतांना त्यांना केस डायरी प्राप्त झाल्यानंतर नि.क्र. २७ अन्वये घटनास्थळाचा पंचनामा पंचासमक्ष तयार केला. सा.क्र. २ एकनाथ सोनेवाने यांनी आपल्या तोंडी पुराव्यात कथन केले की, दि. १५-०२-२०१७ रोजी पो.स्टे. तिरोडा येथे कार्यरत असतांना केस डायरी तपासा कामी प्राप्त झाल्यानंतर नि.क्र. १९ ते २० अन्वये आरोपींना अटक करून आरोपी क्र. १ विरूध्द दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले आणि पुराव्या अभावी आरोपी क्र. २ यांना सदर प्रकरणातुन वगळले.

८. दोन्ही साक्षीदारांची घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये पंचाना लेखी सुचनापत्र देण्यात आले नव्हते आणि घटना त्यांच्या समक्ष घडली नसुन त्यांनी कोणताही मुद्देमाल जप्त केला नसल्याचे कथन केले.

९. अभिलेखावर आलेल्या पुराव्यांचे अवलोकन केले असता आरोपीविरूध्द असलेला आरोप सिध्द करण्यात आलेला नाही. वारंवार फिर्यादी व दाखल अधिकारी यांना समन्स काढुनही अभियोग पक्ष त्यांना न्यायालया समक्ष हजर करून त्यांचा पुरावा नोंदविण्यात अपयशी ठरले. त्यामुळे आरोपी विरूध्द

नोंदविलेली फिर्यादी अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही. पंचाने देखील अभियोग पक्षाचे समर्थन केलेले नाही. आरोपी ७.५ ब्रास गिट्टी विना परवाना वाहतुक करतांना आढळला परंतु त्यासंदर्भातील जप्ती पत्रक अभिलेखावर दाखल करण्यात आलेले नसुन तसे कुठलेही दस्त सिध्द करण्यात अलेले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनामुळे आरोपी खरोखरच शासनाची फसवणुक करून गौण खनिज विनापरवाणा वाहतुक करतांना मिळुन आल्याच्या सिध्द झालेले नाही.

**१०.** वरिल कारणास्तव आरोपी विरूध्दचे आरोप सिध्द झालेले नाहीत. सबब मी **मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविले** आहे आणि मुद्दा क्र.२ बाबत खालील आदेश पारीत करण्यात येत आहे -

**: : आ दे श : :**

**०१.** आरोपी सलमान गफार शेख यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ अन्वये दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**०२.** आरोपींचे कलम ४३७(अ) प्रमाणे रुपये ७५००/- चे बंधपत्र रदद् समजण्यात यावे.

**०३.** आरोपींचे जामीन कब्जे रद्द करण्यात येते.

**०४.** सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर ७.५ ब्रास गिट्टी शासन जमा करण्यात यावी आणि जप्त असलेले टिप्पर सुप्रतनामा बंध पत्रावर सोडले असल्याने, ते बंधपत्र रद्द समजण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

**(श्रीमती अ.तु.बन्सोड)**

**दिनांक : १६.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिरोडा.**